**प्रेसनोट दि. ११.०४.२०२२**

लोकसेवक श्री.सचिन रघुनाथ पाटील, वय ३८ वर्ष, व्यवसाय – तलाठी, तलाठी कार्यालय देशिंग, रा. सदानंद रेसिडेन्सी दुसरा मजला,फ्लॅट नं २०२, तहसिलदार कार्यालयाजवळ मिरज मुळ रा. एरंडोली ता. मिरज जि. सांगली यांना २५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले तसेच लोकसेवक श्री.आनंदा शिवा पाटील वय ४९ वर्ष व्यवसाय नोकरी कोतवाल देशिंग रा. देशिंग ता.कवठेमहंकाळ जि. सांगली यांचा देखील सहभाग असल्याने त्यांना ताब्यात घेतले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी खरेदी केले जमीनीच्या सातबारा उताऱ्यावर खरेदी दस्ताची नोंद करून देण्यासाठी देशिंग येथील तलाठी कार्यालयातील तलाठी श्री. सचिन पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.११.०४.२०२२ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ११.०४.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तलाठी श्री. सचिन पाटील यांनी तक्रारदार यांनी खरेदी केले जमीनीच्या सातबारा उताऱ्यावर खरेदी दस्ताची नोंद करून देण्यासाठी ३०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती २५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे तसेच कोतवाल आनंदा पाटील यांनी तलाठी सचिन पाटील यांना लाच देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लोकसेवक सचिन पाटील तलाठी यांचे विरूध्द तलाठी कार्यालय देशिंग या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री.सचिन रघुनाथ पाटील, वय ३८ वर्ष, व्यवसाय – तलाठी, तलाठी कार्यालय देशिंग, रा. सदानंद रेसिडेन्सी दुसरा मजला,फ्लॅट नं २०२, तहसिलदार कार्यालयाजवळ मिरज मुळ रा. एरंडोली ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लोकसेवक श्री.आनंदा शिवा पाटील वय ४९ वर्ष व्यवसाय नोकरी कोतवाल देशिंग रा. देशिंग ता.कवठेमहंकाळ जि. सांगली यांनी तलाठी सचिन पाटील यांना लाच देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झालेने त्यांना तलाठी कार्याल देशिंग येथून ताब्यात घेतले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री.सचिन रघुनाथ पाटील, वय ३८ वर्ष, व्यवसाय – तलाठी, तलाठी कार्यालय देशिंग, रा. सदानंद रेसिडेन्सी दुसरा मजला,फ्लॅट नं २०२, तहसिलदार कार्यालयाजवळ मिरज मुळ रा. एरंडोली ता. मिरज जि. सांगली व लोकसेवक श्री.आनंदा शिवा पाटील वय ४९ वर्ष व्यवसाय नोकरी कोतवाल देशिंग रा. देशिंग ता.कवठेमहंकाळ जि. सांगली यांचे विरुध्द कवठेमहंकाळ पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, सलिम मकानदार, राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली * सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner